● सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# सणासुदीच्या काळात ऑनलाईन स्कॅमची शक्यता!

## सरकारने जारी केले मार्गदर्शक तत्त्वे; कोणासोबतही ओटीपी शेअर करू नका

**नवी दिल्ली -** दिवाळी अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. यंदाची दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी आतापासूनच अनेक कुटुंबांत तयारी सुरू झाली आहे. विशेष म्हणजे कोणते कपडे घ्यायचे? काय-काय खरेदी करायची? याचंही अनेकजण प्लॅनिंग करत असतील. मात्र याच सणासुदीच्या काळात लोकांतील उत्साह आणि बाजारात होणारी उलाढाल लक्षात घेता अनेकजण ग्राहकांची फसवणूकही करतात. ऑलनाईन शॉपिंगच्या माध्यमातून तर वेगवेगळे स्कॅम होण्याची शक्यता अधिक असते. याच पार्श्वभूमीवर तुमच्यासोबत ऑनलाईन स्कॅम होऊ नये, म्हणून काय खबरदारी घ्यावी?

लोकांचा खरेदीसाठीचा उत्साह लक्षात घेऊन अनेक स्कॅमर्स ॲक्टिव्ह झाले आहेत. त्यामुळे पुढच्या काही दिवसांत अनेकांसोबत ऑनलाईन स्कॅम होऊ शकतो. हीच बाब लक्षात घेता भारतीय कॉम्प्यूटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमने (सीईआरटी-इन) लोकांना योग्य ती खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. सोबतच एक मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहे.

सरकारने ऑनलाईन शॉपिंग करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सांगितलं आहे. भारतीय कॉम्प्यूटर इमर्जन्सी टीम अशा प्रकारच्या स्कॅमपासून सुरक्षित राहण्यासाठी काही टिप्स सांगितल्या आहेत. तुमच्या फोनवर एखादा अनोळखी कॉल आला तर तो रिसिव्ह करताना फोन कॉलची ओळख पटवण्याचा प्रयत्न करा. कोणत्याही अनोळखी व्यक्तीचा व्हिडीओ कॉल रिसिव्ह करणे टाळा. फोन कॉलवर अनोळखी व्यक्तीने पैसे ट्रान्सफर करण्यास सांगितले तर ते करू नका. कोणतीही शासकीय संस्था कोणतेही शासकीय काम करण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅप किंवा स्काईप यासारख्या माध्यमांचा वापर करत नाही.

अनेकदा फसवणूक झाल्यास संबंधित व्यक्ती घाबरून जाते. मात्र घाबरून न जाता घाईगडबडीत कोणताही निर्णय घेऊ नये. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला फोन कॉलवर तुमची वैयक्तिक तसेच आर्थिक माहिती सांगू नये. कॉलवर कोणालाही ओटीपी सांगू नये. एखादा फोन कॉल, व्हिडीओ कॉल, मेसेज, मेल संदिग्ध वाटला तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याला रिपोर्ट करा किंवा पोलिसांच्या निदर्शनास आणून द्या.

मेलवर एखाद्या अनोळखी मेलवरून तुम्हाला एखादी अटॅचमेंट, फाईल आली असेल तर ती डाऊनलोड करू नका. अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून कोणतेही ॲप डाऊनलोड करू नका. फोनमध्ये ॲप डाऊनलोड करायचे असेल



तर गुगल स्टोअर, आयओएस स्टोअर, ॲपच्या अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा.

## शिवसेना पदाधिकाऱ्यांची संजय राऊत विरोधात घोषणाबाजी

**अहमदनगर -** राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती उदयास आल्याने यंदाच्या निवडणुकीत मोठी बंडखोरी होत असल्याचे दिसून येते. राज्यातील अनेक मतदारसंघात ज्या पक्षाला जागा सुटली, तेथील दुसऱ्या मित्र पक्षातील इच्छुक उमेदवार बंडखोरीच्या तयारीत आहेत. बहुतांश जिल्ह्यात अनेक इच्छुकांनी बंडखोरी करत पक्षाच्या पदाचा राजीनामा दिला आहे. आता, अहमदनगर आणि धुळे जिल्ह्यातही तेच पाहायला मिळत आहे. नगर शहर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र आहे. नगर शहराची जागा मविआतील राष्ट्रवादी शरद पवार गटाला दिल्याने शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी नाराज झाले आहेत. जिल्ह्यीतल नगर पान २ वर

युवा आदर्श

### वसुबारस ...

**गो संपदा गौरोत्सव**
**ये महत्व वसुबारसा**
**नैसर्गिक सांस्कृतिक**
**जपतो छान वारसा**
**पूजितो स वत्स धेनू**
**दिवाळीप्रथमदिवसा**
**पुरातन कालापासून**
**पुढे प्रेषित हा वसा**
**धान्य नवीन उगवले**
**निरोप दिला पावसा**
**धन्यवाद दे निसर्गास**
**तुम्हावरी गा भरवसा**
**दुग्ध पूर्णान्न हे अमृत**
**जागृत करते नवरसा**
**ऋण कृतज्ञता सिध्द**
**मानव तासण आरसा**
**राधा कृष्ण प्रसन्न हो**
**तुळस फुलली परसा**
**गोमाता पुढली पिढी**
**जपतो प्रेमाने पाडसा**
**पंच गव्य न् शेणखत**
**उभार आणी कणसा**
**कामधेनु बोले गाईस**
**मुक्तास्ते दिले माणसा**
**गोमाता दिला नवदर्जा**
**शब्द राखला अंमळसा**
**प्रारंभ दिपोत्सवाचा हा**
**आनंदोत्सव हो निरसा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवण्यासाठी पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे - डॉ. शर्मा

**जालना । प्रतिनिधी -** जीवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर, मोठ्या प्रमाणात बोकाळलेली बेरोजगारी, गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण यामुळे राज्यातील महायुती सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी इंडिया महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे जालना लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा यांनी रविवार (दि २७) रोजी येथे बोलतांना केले.

जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या निवडणुक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज रविवारी दुपारी आयोजीत करण्यात आली होते. या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, जालना विधानसभेचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, युवानेते अक्षय गोरंट्याल, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कल्याणराव दळे, प्रमोद रत्नपारखे, विनयकुमार कोठारी, संजोग हिवाळे, बदर चाऊस, बाला परदेशी, माजी गटनेते गणेश राऊत, अब्दुल रऊफ परसुवाले, अब्दुल रफिक, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार, दुर्गेश काठोठीवाले, मनकर्णाताई डांगे, बाबुराव पवार, राम सावंत, दिपक भुरेवाल, दिनकर घेवंदे, किशोर मघाडे, अमेर पाशा, किशोर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ. शर्मा म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही मुळ पक्षांसह त्यांची चिन्ह बंडखोरांनी पळवून नेल्यानंतर देखील लोकसभा निवडणुकीत नविन चिन्ह असतांना या पक्षांना मिळालेले यश सर्व सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी अधोरेखीत करणारी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत देखील इंडिया आघाडी राज्यात सत्तेत येईल असा विश्वास व्यक्त करून राज्यातील महायुती सरकारचे पाय खोलात गेल्यामुळे जाता-जाता त्यांनी लाडकी बहिन योजनेचा डाव टाकून कसाबसा बचाव करण्याचा प्रयत्न केला असला तरी राज्यातील जनता किती जागृत आहे हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले असून या निवडणुकीत देखील तिच परिस्थिती कायम राहील असा ठाम विश्वास डॉ. पी. सी. शर्मा यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पुर्व जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, बाबुराव पवार, संजोग हिवाळे यांची समयोचित भाषणे झाली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद यांनी केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी गणेश राऊत यांनी आभार मानले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राज्यात परिवर्तन करण्यासाठी गोरंट्याल यांना विजयी करा : खा. कल्याण काळे**

राज्यातील सत्तेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी अत्यंत पोषक वातावरण असून त्यासाठी जालन्यातून इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन खा. डॉ. कल्याण काळे यांनी येथे बोलतांना केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, जालना शहर व जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न सोडवून घेण्यासाठी राज्यात आपल्या विचाराचे सरकार असणे गरजेचे आहे. गोरंट्याल हे रोखठोक बोलणारे असून एखांदे काम होत असेल तर ते हो म्हणतात. त्यांचा स्पष्ट वक्तेपणा लोकांना भावतो. जालन्यासह जिल्ह्यातील पाचही जागेवर इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होईल अशी सकारात्मक वातावरण असून पदाधिकारी कार्यकर्त्यांनी येणारे पंधरा दिवस चांगले कष्ट आणि प्रयत्न करून गोरंटयाल यांच्यासह मविआच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन शेवटी डॉ. काळे यांनी केले.

**विचारांच्या मागे निष्ठेने उभे रहा : भास्करराव अंबेकर**

यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी अत्यंत सुसंस्कृत राजकारण केले आहे. त्यांच्या विचारांच्या पाठिमागे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निष्ठेने उभे रहावे असे आवाहन शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. राज्यातील सद्यस्थितीत सुरू असलेल्या राजकीय परिस्थितीवर अंबेकर यांनी आपल्या पान २ वर

# मतदारसंघाच्या विकासासाठी गेल्या पाच वर्षात पाचशे कोटी रुपये निधी आणला - आमदार लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** अनुसूचित जाती जमाती मधील नागरिकांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने राज्य सरकारने नवीन विहीर रु.५ लाख रुपये, जुनी विहीर दुरुस्ती रु.१ लाख, शेत तळी प्लास्टिक अस्तरीकरण रु.२ लाख, इनवेल बोअरिंग रु.४० हजार, वीज जोडणी रु.२० हजार, विद्युत पंप संच रु.४० हजार, सोलर पंप रु.५० हजार, पी व्ही सी पाईप रु.५० हजार, तुषर सिंचन संच रु.४७ हजार, ठिबक सिंचन संच रु.९७ हजार, पारसबाग रु.५ हजार, बैलिचलत ट्रकटर यंत्रसामग्री रु.५० हजार, विंधन विहीर रु.५० हजार अशाप्रकारे अनुदानात भरमसाठ वाढ केली आहे. मुस्लिम समाजाच गेल्या ७० वर्षाच्या कार्यकाळात काँग्रेस ने वाटोळे करून ठेवल असून मुस्लिम समाज आज ही आर्थिक दृष्टीने मागास आहे. मुस्लिम समाजातील मुला-मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण घेता आलं पाहिजे. राज्यातील व केंद्रातील शासकीय सेवेत त्यांना



रुजू होत आला पाहिजे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. आज परतूर शहरात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून साकारलेल्या एक कोटी रुपये किमतीच्या डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम आझाद सांस्कृतिक सभागृहाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना संजय गांधी योजनेचे १८६६ लाभार्थी असून श्रावण बाळ गट अ.व.गट ब. ५७२९ आहेत. राष्ट्रीय वृद्धापकाळ लाभार्थी २७०५. इंदिरा गांधी विधवा लाभार्थी २४३. इंदिरा गांधी दिव्यांग १७५. संजय गांधी अनुसूचित जाती जमाती ५५. श्रावण बाळ अनुसूचित जाती जमाती ५५ आभार त्यांना परतूर तहसील कार्यालय अंतर्गत लाभ देण्यात येत होता. ८९६२ लाभार्थी होते. महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सप्टेंबर महिन्यात परतुर तहसील कार्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीत १४६० पात्र लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली होती. तर ऑक्टोबर २०२४ मध्ये परतुर तहसील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत नव्याने ९०० लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. अशा एकूण ११३२२ लाभार्थ्यांची दिवाळी गोड होणार असल्याची पान २ वर

# टेंभुर्णीत शेतमजूर मिळेनात!

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील शेतात फुटलेला आहे हातातोंडाशी आलेल्या पिकाचे परतीच्या पावसाने नुकसान होऊ नये, म्हणून सर्वच शेतकरी काढणीची घाई करीत आहेत. त्यामुळे टेंभुर्णी परिसरात शेतमजुरांचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. वेळेवर मजूर मिळावेत म्हणून एका महिला मजुरासाठी ३०० ते ४०० रुपये रोज, तर पुरुष मजुरासाठी ५०० ते ६०० रुपये रोजंदारी द्यावी लागत लागत आहे. या हंगामाच्या सुरवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने खरिपाची जवळपास सर्वच पिके जोमात येऊन बहरली होती. त्यामुळेच शेतकऱ्यांनी



जास्तीचे उत्पन्न मिळावे म्हणून पिकांच्या मशागत व रासायनिक खते, औषधी यावर मोठा खर्च केला. मात्र, त्यानंतर सतत अवेळी झालेल्या अतिवृष्टीने परिसरातील कपाशी, सोयाबीन, बाजरी, मकासह सर्वच पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला, तर कपाशी पिकाला लाल्या रोगाने ग्रासले. आता पिके काढणीला रोजंदारीच्या कामाला जाण्यासाठी टाळाटाळ मुख्यमंत्री माझी लाडकी पान २ वर

संपादकीय पान

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा !

मागील वर्षी बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. पराग देसाई यांचा असा वेदनादायी अंत खरोखरीच दुर्दैवी होता. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला होता. पराग देसाई यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्यावर स्वतःचा बचाव करताना पराग देसाई अडखळून पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. पराग देसाई यांचा मृत्यूने संपूर्ण राज्य हळहळले. पराग देसाई हे प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे त्यांच्या मृत्यूची बातमी झाली न्युज चॅनलवर त्याची ब्रेकिंग न्युज झळकली होती तेंव्हा अशी अपेक्षा होती की भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलण्यात येतील मात्र ही अपेक्षा फोल ठरली कारण भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे कोणतेही ठोस पावले उचलण्यात आली नाहीत. उलट भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई हे देशातील पहिले व्यक्ती नसून याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. आपल्या देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारी आहे. दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले , वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीज वरील लसच उपलब्ध नसते. ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटके कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते. खूपच मागणी झाली किंवा प्रसार माध्यमातून आवाज उठवला तर दिखाव्यासाठी कारवाई केली जाते. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजिकरण नियमित केले जाते असे प्रशासनामार्फत सांगितले जाते मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. जर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण नियमित केले जाते तर मग देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढत आहे असा प्रश्न आहे. एकट्या मुंबई शहराचे उदाहरण घेऊ. २०१४ साली मुंबईत ९५ हजार भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील , नऊ वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे. प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकाणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे . म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिति नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**





जालना शहरातील मुख्य बाजारपेठेत दिवाळी सणानिमित्त बाजारपेठ सज्ज झाली असून नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी करत आहेत. (छायाचित्र अनिल व्यवहारे)

# वसुबारस (गोवत्स द्वादशी) चे महत्त्व

आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. वसुबारस हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तूतः हा सण वेगळा आहे. या सणाविषयी तसेच यानिमित्ताने गोपालनाचे महत्त्व थोडक्यात जाणून घेऊया.

श्री विष्णूच्या आपतत्त्वात्मक लहरी कार्यरत होऊन ब्रह्मांडात येण्याचा दिवस म्हणजे वसुबारस ! या दिवशी विष्णुलोकातील वासवदत्ता नामक कामधेनु या लहरींचे वहन ब्रह्मांडापर्यंत करण्यासाठी अविरत कार्य करते. या दिवशी या कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशी वृंदावनाशी धेनु म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतिकात्मक रूपात पूजन केले जाते. या दिवशी आपल्या अंगणातील गाईला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस




असे म्हणतात. बारस म्हणजे एखाद्या गोष्टीत नवीन चैतन्यबीजाची निर्मिती होणे. हेच देवत्व तिच्या ठायी कायम स्वरूपी विष्णूरूप पाहून जिवाने टिकवायचे असते आणि तिच्यातून प्रक्षेपित होणार्या चैतन्यलहरींचा लाभ उठवायचा असतो.

इतिहास : समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.

उद्देश : या व पुढील अनेक जन्मांतील कामना पूर्ण व्हाव्यात आणि पूजा करत असलेल्या गायीच्या शरीरावर जितके केस आहेत, तितकी वर्षे स्वर्गात रहायला मिळावे.

सण साजरा करण्याची पद्धत : या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात.

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करावी का ? पूजा करणे शक्य नसल्यास काय करावे ? :

वसुबारस या दिवशी बाहेर पडून सवत्स गायीची पूजा करण्यास अडचण असेल, तेव्हा घरी एखादी गायीची मूर्ती असल्यास तिची पूजा करावी. घरी मूर्ती नसल्यास गायीचे पाटावर चित्र काढून त्याची पूजा करावी.

गोपालनाचे महत्त्व ! : पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांच्या आधाराने सृष्टीची निर्मिती झाली आणि तिचे चलनवलनही चालू आहे. या पंचमहाभूतांची गाय ही माता आहे. काळाच्या ओघात तिचीच अवहेलना झाल्याने आज सर्वतर्हेचे प्रदूषण गंभीररित्या वाढले आहे. हे वेळीच रोखायचे असेल, तर गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन याला पर्याय नाही. एकप्रकारे गोमाता पंचमहाभूतांच्या कुपोषणाची अधिकारिणी आहे. वसुबारस या सणाच्या निमित्ताने गोमातेचे महत्त्व लक्षात घेऊन गोरक्षण, गोपालन आणि गो उत्पादनांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करूया.

गुरुद्वादशी : आश्विन वद्य द्वादशी या तिथीला शिष्य गुरूंचे पूजन करतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण,धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था ९२८४०२७१८०**

# नागपूर, ठाणे, बारामती ; मतदारांची कसोटी

राजकारण हे जनसेवेची कास धरून समाजाभिमुख सत्ता राबवणे ह्याची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांनी देशालाच नव्हे तर जगाला करून दिली.महाराजांची शिकवण,राजकारण,राज्याप्रती असलेली सहिष्णुताचा मागोवा घेत रायगडावरील माती कपाळी लावून आपल्या देशात आदराने सन्मानाने घेऊन जाणारे परदेशी सत्ताधारी नेते पहिले कि,आपली छाती अभिमानाने फुलून येते.त्याच महाराष्ट्रात आधुनिक नतद्रष्ट अणाजीपंत,सूर्याजी पिसाळ,खंडोजी खोपडे यांचा जन्म झाला आणि महाराष्ट्राची माती कलंकित झाली.महाराष्ट्रला लागलेला हा कलंक धुवून काढायचा असेल तर विधानसभेच्या निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री होता आले नाही म्हणून अहंकाराने पेटून उठलेल्या देवेंद्र फडणवीस,ह्यांनी राजकीय पक्ष फोडाफोडी केली,भ्रष्टाचारी गुन्हेगारांना क्लीन चिट देऊन महाराष्ट्राला आर्थिक आणि सामाजिक खड्ड्यात घालणारे व नामुष्की पदरात पाडून घेण्याची कृत्य केले.आज अणाजीपंत जिवंत असते तर त्यांनी शरमेने मान खाली घातली असती इतका हलक्या मनोवृत्तीचा माणूस ह्या महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आला हे राज्याचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.सूर्याजी पिसाळांचे वंशज एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांना दैवत मानतात तर धर्मवीर आनंद दिघेंना गुरु मानतात त्यांची शिकवण मातीमोल केली इतका निर्लज्ज गुरुशिष्यांच्या नावाला कलंक लावणारा प्राणी सत्तेच्या हव्यासापायी.सर्वच नीतिमत्ता गुंडाळून पाठीत खंजीर खुपसून सत्ता ओरबाडताना भ्रष्ट आणि कलुषित मनाचा नतद्रष्ट शिवसेनेसारख्या शिवरायांचा वारसा चालवणाऱ्या शिवसेनेला खंडार पाडण्याचा प्रयत्न केला.सत्तेचा दुरुपयोग करतआपल्या मतांची बेगमी करताना काही लालची योजना जाहीर करून राज्याला कर्जाच्या खाईत लोटले.आपले दुष्कर्म तेहतीस देशात पोहोचले ह्याची बढाई निर्लज्जपणे सांगतो. हे कधीच महाराष्ट्राच्या इतिहासात घडले नाही.काकांचा हात धरून राजकारणात मोठे झालेले,ह्याला पाडीन,तू कसा निवडून येतो ते बघतो असे भर सभेत गर्भित धमकी देतो. निर्लज्जपणे धरणात मुतण्याची भाषा करणारे,सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा पचवणारे व त्यातील काही टक्केवारी कदाचित भाजपाला देऊन उर्वरित माल हडप करण्याची किमया



केली.बेगुमानपणे सत्तेचा उपभोग घेणारे,काकांच्या पाठीत वार करणारे आधुनिक खंडोजी खोपडे अजित पवार ह्यांचाही जन्म ह्याच मातीत झाला हीही दुर्दैवी बाबच आहे.महाराष्ट्राची प्रतिमा प्रतिष्ठा संस्कृती ह्या तीन भ्रष्ट संधीसाधू सत्तालोभी नतद्रष्ट नराधमांनी कलंकित केली.ते गेलेलं वैभव परत मिळवायचे आहे. आपल्याला शिवरायांचा विचारांचा महाराष्ट्र घडवायचा आहे,तर येत्या निवडणुकीत मतदारांनी देवेंद्र फडणवीस,एकनाथ शिंदे व अजित पवार ह्यांना कात्रजचा घाट दाखवत कायमचे घरी बसवले पाहिजे भले त्यांनी आपल्या मतदारसंघात स्वतःची जागा भक्कम करण्यासाठी राज्याच्या तिजोरीचा गैरउपयोग केला असेल तो त्यांचा मतलबीपणा आहे.त्यासाठी त्यांना अचंबित वाटेल इतक्या सरकारी सुख सोयी सुविधा तुमच्या आमच्या जमा होणाऱ्या करातूनच मिळतात.ते जनतेचेच आश्रयदाते आहेत. त्यात ते टक्केवारीहि खातात हा त्यांना झालेला भ्रष्ट भस्म्या रोग आहे.नागपूर ठाणे बारामती येथील मतदारांनी हे तीन नेते कितीही जवळचे असले,त्यांच्याबद्दल आदर वाटत असेल,त्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून मतदारांची काही खाजगी कामेही केली असतील तरी त्यांनी महाराष्ट्राची वाताहत केली आहे राज्य आर्थिक कर्जात बुडवले आहे त्याची भरपाई हि सर्व सामान्य नागरिकांनाच करावी लागणार.आपल्या पुढील पिढीला राज्य भरभराटीला आणणारे लोकप्रतिनिधी निवडून देणे हि काळाची गरज आहे.महाराष्ट्राच्या उज्वल भविष्याचा विचार करता.ह्या तीन नतद्रष्ट नेत्यांना जर मतदारांनी घरी बसवले नाही तर महाराष्ट्रात सुडाचे राजकारण सुरु होऊन जनजीवन विस्कळीत होईल.महाराष्ट्र युपी, बिहार च्या मार्गावर आहेच तो त्यांच्याही पुढे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.ह्या तीन नेत्यांना मतदान करून पापाचे धनी व्हायचे कि,महाराष्ट्राचा विकास करायचा कि भकास हे तीन जिल्ह्यातील मतदारांनी ठरवायचे आहे.महाराष्ट्र व मराठी माणूस मोठा कि तीन भ्रष्ट नेते मोठे ह्याचा विचार करून त्यांना मतदान करून स्वतः च्या नजरेतुन पडू नये.



**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**
**दूरधवनी क्र.९९२०७७६२७७**

## पान १ वरुन

### शिवसेना पदाधिकाऱ्यांची ...

शहर विधानसभेची जागा विकल्याचा आरोप करत शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी खा. संजय राऊत यांच्याविरोधात घोषणाबाजी केली आहे. संजय राऊत मुर्दाबाद, खाली मुंडक वर पाय... अशा घोषणा देत शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांन जाहीरपणे नाराजी व्यक्त केलीय. तसेच, आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे. दुसरीकडे धुळे जिल्ह्यात सहसंपर्क प्रमुखाने राजीनामा दिला आहे. महाविकास आघाडीच्यावतीने नगर शहर विधानसभेची जागा राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अभिषेक कळमकर यांना देण्यात आली आहे. वास्तविक नगर शहर विधानसभा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला असताना देखील ही जागा राष्ट्रवादीला दिल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजी पाहायला मिळते आहे. त्यामुळे, उद्या शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक होणार असून कार्यकर्त्यांचा विचार घेऊन दोघांचे उमेदवारी अर्ज मंगळवारी भरले जाणार असल्याची माहिती आहे. कार्यकर्त्यांनी उमेदवारी करण्याचा निर्णय कायम ठेवल्यास शिवसेना ठाकरे गटाचे सर्व पदाधिकारी राजीनामे देणार असल्याचंही शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख शशिकांत गाडे यांनी सांगितले आहे.

### राज्याच्या सत्ताकारणात ...

भाषणातून जोरदार टिका केली. अत्यंत खालच्या स्तरावर जावून राजकारण करण्याला प्राधान्य दिले जात असल्याबद्दल शोकांतीका व्यक्त करून एकीकडे लाडकी बहिनीसारखी योजना राबवायची आणि दुसरीकडे बालिकांसह महिलांवर दिवसाढवळ्या अत्याचार वाढत असून ही परिस्थिती बदलण्यासाठी जालन्यातून आ. कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्यासाठी परिश्रम घ्यावे लागणार आहेत. सोयाबिन, कापसाचे भाव कोसळल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी राज्यात परिवर्तन आवश्यक असल्याचे सांगून अंबेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ना खाऊंगा ना खाने दुंगा या घोषणेची आपल्या भाषणातून चांगलीच खिल्ली उडवली. कोणतेही काम टक्केवारी शिवाय होत नाही अशी परिस्थिती जवळपास सर्वच ठिकाणी निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आ. कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्याचे आवाहन अंबेकर यांनी केले.

**गद्दारांना शिवसैनिक धडा शिकवतील - आ. कैलास गोरंटयाल**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत शिवसैनिक निश्चितपणे धडा शिकवतील असा विश्वास इंडिया महाविकास आघाडीचे जालना विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलतांना व्यक्त केला. ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाकडे आपल्यासह अनेकांनी तिकीट मागितले होते. मात्र, तिकीट आपल्याला मिळाले. उमेदवारी मागणे हा प्रत्येकाचा अधिकार असून त्यांच्याशी आपले कोणतेही वैर नाही. विधानसभेची निवडणूक भयमुक्त वातावरणात झाली पाहिजे यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. आतापासूनच दादागिरी, गुंडगिरीचे प्रकार सुरू झाले असून त्यांची शिकवण तशी आहे. त्यामुळेच त्यांनी गद्दारी केल्याचा टोला आ. कैलास गोरंटयाल यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याला लगावला आहे. जालन्यासह जिल्ह्यातील मविआ उमेदवार निवडून आणायची जबाबदारी आपल्या सर्वांची असून आघाडीतील सर्व घटक पक्षांनी आघाडीचा धर्म पाळावा अशी अपेक्षा शेवटी गोरंटयाल यांनी व्यक्त केली.

### मतदार संघाच्या ...

माहिती या वेळी उपस्थित नागरिकांना आमदार लोणीकर यांनी दिली.भगवानराव मोरे, दया काटे महाराज, खय्युम पठाण, नगरसेवक कृष्णा आरगडे, संदीप बाहेकर, प्रवीण सातोणकर, प्रकाश चव्हाण, ॲड. काळे, शेख आबेद, माजद भाई, तुकाराम काळे, अहमद भाई, कोंडीभाऊ पहाडे, राजाभाऊ सोनटक्के, कादर भाई, परमेश्वर सांगुळे, योगेश सांगुळे, बबनराव पवार, अब्दुल रहमान मुज्जू कायमखानी मलिक कुरेशी, एक्का भाई यांच्या सह शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

### टेंभूर्णीत शेतमजुर ...

बहीण योजनेचे तीन हप्त्यांचे पैसे महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. त्यामुळे अनेक महिला मजूर रोजंदारीच्या कामाला जाण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. आली असता शेतकरी शेतमजुरांच्या दारी खेट्या मारीत असल्याचे चित्र येथे पाहावयास मिळत आहे.

टेंभुर्णी परिसरात उंद्री तालुका चिखली, धाड, विदर्भातून मजूर शेतीत काम करण्यासाठी आणल्या जातात. त्या मजुराला आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था केल्या जाते. त्याचाही खर्च शेतकऱ्याकडूनच घेतल्या जातो. त्यामुळे शेतकरी चोहोबाजूंनी त्रस्त आहे.

आंबेगाव शिवारात शेती असलेल्या कापुस उत्पादक शेतकरी विश्वनाथ सांगोळे यांनी सांगितले की, आठवड्याभरापासून मजुरांच्या घरी कापूस वेचणीसाठी खेट्या माराव्या आहे. मात्र, अद्याप मजुर मिळालेले नाहीत. बाहेरगावच्या मजुरांसाठी वाहनांची व्यवस्था करावी लागते. तर गणेश धणवाई म्हणाले की, शेतकऱ्यांना जर शेतमजुर हवे असतील तर त्यांना नेण्या-आणण्यासाठी चारचाकी वाहनासह पिण्यासाठी जारचे पाणी हवे असते, याबाबी मिळत असतील तरच हे मजुर येण्यासाठी तयार होतात.

## अवकाळी पावसाचा जाफ्राबाद तालुक्यातील पीकांना फटका; सोयाबीन, मका, कापूस पिकांचे नूकसान



# तात्काळ पंचनामे करुन आर्थिक मदत जाहीर करा - हर्षल फदाट

**जाफराबाद । प्रतिनिधी** - अवकाळी पावसामुळे जाफ्राबाद तालुक्यातील सोयाबीन,मका, कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी हर्षल फदाट यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

ऑक्टोबर महिन्यात जाफ्राबाद तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस झाल्याने या परतीच्या पावसाने तालुक्यातील सोयाबीन,मका,कापूस व तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत. त्या नुकसान झालेल्या पिकांची सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी या संदर्भात तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे यांची शेतकरी पुत्र हर्षल मोतीराम फदाट यांनी भेट घेऊन निवेदन सादर केली.

तालुक्यामध्ये प्रचंड प्रमाणात शेतीमालाचे नुकसान झाले असून वादळी वाऱ्यासह पावसामुळे कपाशी, मक्का, तुर,जमिनीवर पडले असून कपाशीच्या बोंड्या मोठ्या प्रमाणात पावसामुळे खराब झाल्या तर मकाच्या कंसाला अंकुर फुटले असून शेतकरी बांधवांच्या हाता- तोंडाशी आलेला घास परतीच्या पावसाने हिरावून घेतला आहे. काही दिवसांवर सर्वात मोठा सण म्हणजे दिवाळी सण येत असल्याने व शेतकरी बांधवांचे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांची यावर्षीची दिवाळी ही गोड होणार नसल्याने प्रशासनाने तात्काळ सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करून, शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी शेतकरी पुत्र हर्षल पाटील फदाट यांनी निवेदनाच्या माध्यमातून केली आहे..

# रोटरी क्लब मिडटाऊनच्यावतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त कपडे वाटप

**जालना । प्रतिनिधी** - रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनच्यावतीने दिवाळीनिमित्त जालना शहरातील सहकार बँक कॉलनीतील भारत माता मागासवर्गीय अपंग निवासी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त कपडे वाटप करण्यात येऊन त्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

दिव्यांग हे देखील समाजाचा एक घटक आहेत. दिवाळीनिमित्त त्यांचाही आनंद द्विगुणित करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब मिडटाऊनतर्फे आयुष बन्सल व परिवाराच्या सहकार्याने दिव्यांग विद्यार्थ्यांना कपडे वाटप करण्यात आले. यावेळी क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सचिव गौरव मोदी, आयुष बंसल, प्रतीक नानावटी आणि शाळेच्या शिक्षकांची उपस्थिती होती.

क्लबच्यावतीने गेल्या २० वर्षापासून नवरात्रोत्सवात डिव्हाईन दांडियाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी दांडियाचे आयोजन न करता, विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. नवरात्रोत्सवात मोफत मधुमेह निदान शिबिर, रक्तदान शिबिर, पानेवाडी येथील महात्मा फुले




विद्यालयात शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर लोकार्पण आणि दिवाळीनिमित्त दिव्यांगाना कपडे वाटप असे उपक्रम राबवण्यात आले. लवकरच चॅरिटीशोचे आयोजन करून त्या माध्यमातून स्व. राजीव गांधी मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पलंग (बंक बेड) प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी यांनी दिली.

# दुचाकीचा भीषण अपघात,एक जण गंभीर जखमी

## भोकरदन नाका परिसरात हाटेल ग्रीन पार्क समोरील घटना

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील भोकरदन नाका परिसरात हाटेल ग्रीन पार्क समोर ऊभ्या कारला धडकून दुचाकीस्वार गंभीररित्या जखमी झाल्याची घटना दि.२४ गुरुवार रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास घडली आहे. चक २१ उ २४४१ असा अपघात झालेल्या दुचाकीचा क्रमांक आहे.
आज दि.२५ सकाळी आठ वा. च्या सुमारास मिळालेल्या माहितीनुसार शहरातील लक्कडकोट भागातील राहीवाशी गुरूदास ओम नवलकर (वय ३५) हे दुचाकीवरून जात असताना ऊभ्या कार ला जोरदार धडकल्याने हवेत ऊडाले आणि खाली कोसळले. यामध्ये गुरूदास नमलकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जवळच असलेले ग्रीन पार्क चे हाटेल मालक अकबर खान बने खान यांनी जखमी युवकास तात्काळ आटो रिक्षामध्ये घेवून नजीकच्या खाजगी रूग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले आणि युवकाच्या नातेवाईकांस घटनेची माहिती दिली. डोक्यावर गंभीर मार असल्याने डाक्टरांनी प्रथोमपचार करून पुढील उपचारासाठी मोठ्या रूग्णालयात रेफर करण्याचा सल्ला दिला त्यावरून नातेवाईकांनी जखमी युवकास औरंगाबाद येथील रुग्णालयात हलविले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# राजू बावस्कर वुशू स्पर्धेत कास्य पदक



**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाडी बु. चा १२ वी चा विद्यार्थी राजू किसन बावस्कर याने शालेय वुशू स्पर्धेत सुरुवातीपासूनच अत्यंत चांगली कामगिरी करत तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तर अशी एक एक पायरी चढत यशाच्या शिखराकडे यशस्वी वाटचाल केली. काल झालेल्या राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत सुद्धा त्याने अत्यंत चांगला खेळ दाखवत कास्य पदकाला गवसणी घातली. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही जवाहर विद्यालय, वाडी बु. चे नाव राज्यपातळीवर गाजत आहे. राजू बावस्कर याच्या उत्तुंग यशासाठी संस्थेचे अध्यक्ष योगेश पाटील दळवी व सचिव श्री लक्ष्मणराव पा.दळवी,दिनेश पा दळवी , आनंद पा. वाघ, प्राचार्य पंढरीनाथ शिंदे, क्रिडा शिक्षक मंगेश रगडे भरत सिरसाठ व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर सहकार्यानी हार्दीक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# कर्जत जामखेडचे विकासपुत्र रोहित पवार आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

**कर्जत जामखेड । प्रतिनिधी** - कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आणि जनसामान्यांचा आवाज बनलेले आमदार रोहित पवार हे सोमवारी (दि. २८ ऑक्टोबर ) आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून आमदार रोहित पवार यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक क्षणी शिरुर लोकसभेचे लोकप्रिय संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गेल्या पाच वर्षात रोहित पवार यांनी मतदारसंघात लोकाभिमुख, प्रगतिशील आणि दूरदृष्टीपूर्ण विकासकामे केली आहेत. शिक्षण, आरोग्य, नागरी सुविधा अशा महत्त्वाच्या क्षेत्रात सुधारणा करून सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांनी पाच वर्षात दिलेले शब्द पुर्ण केले. त्यांच्या कार्यशैलीमुळे प्रामाणिक, ध्येयवेडे आणि स्वाभिमानी नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. जनसामान्यांसाठी झगडणारा, स्वाभिमानाने लोकांसाठी लढणारा असा त्यांचा लौकिक आहे. मतदारसंघाच्या कायापालट करण्याच्या ध्येयाने विकासाचे व्हिजन ठेवत त्यांनी आपल्या कामातून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. जनतेचा अपार विश्वास आणि



विकासाची दूरदृष्टी असलेल्या रोहित पवार यांच्याकडे उद्याचं राज्याचे नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. विकासाचे ध्येय आणि जनहिताची निष्ठा जोपासणाऱ्या या नेत्याच्या पाठिशी पुन्हा एकदा संपूर्ण कर्जत-जामखेडकर एकवटला आहे. त्यामुळे ही निवडणुक कोणी कशावरही नेण्याचा प्रयत्न केला तरी ही निवडणूक विकास विरुद्ध विकासाचे मारेकरी ह्या एकाच मुद्यावर होणार आहे आणि यामध्ये आमदार रोहित पवार यांची कित्येक पटीने सरशी होणार हे निश्चित आहे.

आमदार रोहित पवार हे उद्या सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार असून यावेळी कर्जत येथील फाळके पेट्रोल पंपाशेजारील मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आपल्या लाडक्या नेत्याला पाठिंबा देण्यासाठी कर्जत जामखेड मतदारसंघातील सर्व स्वाभिमानी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# सत्यम मांटे चे यश; एमडी प्रवेश परीक्षेत देशात ४३९ वी रँक



**टेंभुर्णी** - देऊळगाव राजा येथील सत्यम वसंता मांटे याने एमडी प्रवेश परीक्षेत यश संपादन केले आहे. या परीक्षेत त्याला देशातून ४३९ वी रँक मिळाली आहे. यापूर्वी सत्यम ने नीट व एमबीबीएस परीक्षेत ही मोठे यश संपादन केले होते. जाफराबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षक वसंत मांटे व शिक्षिका रंजना मांटे (सांगळे) यांचा मुलगा असलेल्या सत्यम चे प्राथमिक शिक्षण टेंभुर्णी येथील जिल्हा परिषद शाळेत झालेले आहे. ग्रामीण भागात शिकूनही सत्यमने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. सत्यम ने आपल्या यशाचे श्रेय आपले आई-वडील व शिक्षकांना दिले आहे. या यशाबद्दल त्याच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांनी घरी जाऊन सत्यम चा गौरव केला. यावेळी सत्यम चे वडील वसंत मांटे, आई रंजना मांटे (सांगळे) यांच्यासह शिक्षिका सुखदा पाटील, वंदना पाटील, सविता बरंडवाल, उषा सोळंके, छाया पुंगळे आदींची उपस्थिती होती.

# पत्रकार कृष्णा पठाडे यांना मातृशोक

**जालना । प्रतिनिधी** - दैनिक पार्श्वभूमीचे पत्रकार कृष्णा पठाडे यांच्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई मधुकरराव पठाडे यांचे आज रविवार दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अल्पआजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पश्चात पती मधुकरराव पठाडे, धोंडीराम आणि कृष्णा पठाडे ही २ मुले, सुना- नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रात्री ७ वाजता दाभाडी (ता. बदनापूर) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



# पनवेलच्या वनवासी कल्याण आश्रमात जॉय ऑफ गिव्हिंगचा दिवाळी भेट उपक्रम

**पनवेल । प्रतिनिधी** - मुंबई व परिसरात सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या जॉय ऑफ गिव्हिंग ह्या सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी पनवेल जवळील वनवासी कल्याण आश्रमाच्या वस्तीगृहातील निराधार आदिवासी मुलांसाठी दिवाळी भेट उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जॉय संस्थेचे नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील, हॅप्पी रायडर गजानन पाटील, सभासद भूषण मुळ्ये, मीना भूतकर, डॉ सुभाष घोलप, डॉ बालाजी सुकणे, डॉ राहुल होगाडे, मंगेश देवकर तसेच नेरुळ युथ कौंसिलचे सुभाष हांडे देशमुख, रमेश सुर्वे, अशोकराव महाजन, दत्ताराम आंब्रे, रवींद्र कांबळे इत्यादी कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. वसतीगृहाचे केंद्र प्रमुख संदीप शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व वनवासी कल्याण संस्थेच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच सूत्रसंचालन वैभव पाटील यांनी केले. जॉय संस्था विविध भागात विविध घटकांसाठी करत असलेल्या कार्याची माहिती देत त्यांनी संस्थेच्या सदर उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सभासदांचे आभार मानले. जॉय चे अध्यक्ष गणेश हिरवे यांच्या मार्गदर्शन व अथक प्रयत्नाने जॉयची वाटचाल अनेक सदस्य जोडणारी व त्या माध्यमातून हजारो गरजूंपर्यंत पोहोचणारी ठरत आहे असे विषद करत त्यांनी उपस्थित सर्व सभासदांचा अल्पपरिचय करून दिला. भविष्यातील शिक्षण अनेक आव्हानांचा सामना करायला लावणारे असून आपले करिअर सुकर करण्यासाठी मुलांनी अभ्यासात झोकून द्यावे व स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर आपल्याला कठीण परिस्थितीत शिक्षण देणाऱ्या वनवासी आश्रम वस्तीगृहाच्या वाटचालीस हातभार लावावा असे आवाहन पाटील यांनी उपस्थित मुलांना केले. उपस्थित सर्व मान्यवरांचा तसेच केंद्रप्रमुखांचा यावेळी वाचनीय पुस्तक तसेच दिवाळी फराळ भेट देऊन जॉयच्या वतीने सन्मान करण्यात आला. युथ कौंसिलचे सुभाष हांडे देशमुख यांनी आपल्या मनोगतात जॉयच्या कार्याचे कौतुक करत असेच कार्य पुढे अधिक जोमाने सुरू ठेवून जास्तीत जास्त गरजू लोकांच्या कामी येण्याचा सल्ला देत सदस्यांचा हुरूप वाढवला. पनवेल वनवासी आश्रमात गेल्या अनेक वर्षांपासून मुलांना सर्वतोपरी मदतीसाठी सदैव तत्पर असणाऱ्या देशमुख यांनी यावेळी मुलांना अनेक महत्वपूर्ण टिप्स दिल्या. जॉयच्या उपक्रमात नेरुळ युथ कौंसिलला सहभागी होण्याची संधी म्हणजे दुग्धशर्करा योग असल्याचेही त्यांनी सांगितले. भविष्यात ह्या दोन संस्था अधिकाधिक गरजूंच्या कमी येतील अशी आशा व्यक्त करत त्यांनी दोन्ही संस्थांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहीती दिली. यावेळी डॉ सुभाष घोलप, डॉ बालाजी सुकणे यांनीदेखील आपल्या मनोगतातुन अशा स्तुत्य उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने खूप समाधान व आनंद होत असल्याचे सांगितले. यावेळी मुलांना दिवाळी फराळ, जीवनावश्यक वस्तूंचे किट, पेन, बिस्कीट, चोकोलेट्स, केक इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ सुकणे यांनी शासनाच्या १०८ रुग्णवाहिका हया महत्वाकांक्षी प्रकल्पाबाबत माहिती देत ह्या रुग्णवाहिकेचे कार्य कसे चालते याचे प्रत्यक्ष रुग्णवाहीकेद्वारे सादरीकरण केले. वसतिगृहातील मुलांनीदेखील यावेळी गीते, कविता उपस्थितांसमोर सादर केल्या. पनवेलजवळील निसर्गरम्य अशा चिंचवली गावाच्या हद्दीत वनवासी कल्याण आश्रमाचे गरीब, गरजू, अनाथ मुलांसाठी वस्तीगृह गेल्या जवळपास ४० वर्षांपासून चालवण्यात येत आहे ज्यात जवळपासच्या तीन चार तालुक्यातील मुले ज्यांना कुठलाही कौटुंबिक, पालकत्वाचा आधार नाही असे मुलांचे संगोपन, शिक्षण, संस्कार व कौशल्य विकास करण्याचा स्तुत्य उपक्रम अविरतपणे सुरू आहे. खरेतर सध्याच्या स्वार्थी व मतलबी जगात कुठल्याही लाभाची अपेक्षा न ठेवता निस्वार्थी भावनेने काम करणाऱ्या अशा संस्थांचे कौतुकच व्हायला हवे असे मत सर्वच मान्यवरांनी मांडले. जॉय ऑफ गिव्हिंग संस्थेमार्फत गरीब, गरजूंसाठी सातत्याने विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम मुंबई, ठाणे व पालघर परिसरात सुरू आहेत. याच उपक्रमांचा भाग म्हणून दिवाळीच्या अगोदर फराळ व दिवाळीसाठी उपयुक्त किराणा सामान वाटपाद्वारे वस्तीगृहातील मुलांची दिवाळी गोड करण्याचा आदर्शवत उपक्रम जॉय संस्थेचे सभासद वर्गणीद्वारे राबवत आहेत यासाठी सर्व स्तरांतून जॉय संस्थेचे कौतुक होत आहे. तसेच जॉयचे अध्यक्ष गणेश हिरवे यांनी दोन महिन्यांपूर्वी त्यांच्यावर झालेल्या एका मोठ्या शस्त्रक्रियेसाठी जॉयच्या सदस्यांनी जमा केलेली मात्र त्यांनी नाकारलेली आर्थिक मदत या उपक्रमासाठी देत सामाजीक कार्यात एक अनोखा आदर्श निर्माण केला आहे. ह्या आश्रमाचे संपूर्ण कार्य समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था व आश्रमातील माजी विद्यार्थ्यांच्या देणगीवरच चालत असल्याने यासाठी अधिकाधिक घटकांनी सढळ योगदान देण्याची आवश्यकता आहे तसेच समाजात वाढत चाललेली गरीब श्रीमंत दरी कमी करण्याचे व असंख्य गरीब, गरजू, निराधार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रत्यक्षात काम वनवासी कल्याण आश्रमासारख्या संस्थांमार्फत करण्यात येत असल्याने त्यांना समाजातून यथाशक्ति सर्वतोपरी पाठबळ मिळण्याची गरज आहे असे मत यावेळी जॉयचे समन्वयक वैभव पाटील यांनी व्यक्त केले.



## फेकाफेकी, उर्मट भाषेचा वापर अन् शेरोशायरी करणाऱ्यांना जनतेने ओळखले

# अर्जुनराव खोतकर यांचा विकासरथ अन् विजय कोणू रोखू शकत नाही

### बुथप्रमुख, शिवदूत, गटप्रमुख, व प्रमुख पदाधिकारी मेळाव्यात विश्वास व्यक्त

**जालना । प्रतिनिधी -** फेकाफेकी, उर्मट भाषेचा वापर आणि नुसती शेरोशायरी करणाऱ्यांना जनतेने ओळखले आहे त्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजय कोणीच रोखू शकत नाही असा विश्वास बूथ प्रमुख, शिवदूत गटप्रमुख, आणि प्रमुख पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण मेळाव्यातून व्यक्त करण्यात आला.

दर्शना बंगला भाग्यनगर येथे आयोजित या मेळाव्यास साडेतीनशे बूथप्रमुख, चारशेवर शिवदुत , तीनशे गटप्रमुखासह महत्वाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यात प्रचार कसा करायचा, मतदान कसे करून घ्यायचे, मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी सर्व समाजघटकांसाठी घेतलेले निर्णय लोकांना कोणत्या पद्धतीने सांगायचे, तसेच माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पदावर नसतानाही मतदारसंघात कोट्यावधी रुपयांची कामे सुरू केली आहे. त्याबाबत माहिती द्यायची. लाडकी बहीण योजना, मेडिकल कॉलेज, पाणीपुरवठा योजना, एक रुपयात शेतकरी पिक विमा योजना, महिलांच्या अनेक योजना, अशा शहर व ग्रामीण भागात राबवलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. जनतेची सेवा, सुरक्षा आणि विकास या आधारावर विकासपुरुष अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीशी जनमत तयार झाले आहे. फेकाफेकी, उर्मट भाषेचा वापर आणि नुसतीच शेरोशायरी करणाऱ्यांना जनतेने ओळखले असून अर्जुनराव खोतकर यांचा विकासरथ आणि विजयरथ कोणीच रोखू शकणार नाही असा दुर्दम्य विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या मेळाव्यास अर्जुनराव खोतकर, पंडितराव भुतेकर, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे ,कालींदाताई ढगे, भास्करराव मगरे, विष्णू पाचफुले ,आत्मानंद भक्त, श्रीकांत पांगारकर, महेश दुसाने ,विजाताई चौधरी, फिरोज आला तांबोळी, आदींनी देखील मार्गदर्शन केले . यावेळी डॉ.सुयोग कुलकर्णी, गणेश सुपारकर, संतोष मोहिते, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे ,अमोल ठाकूर, सविता किवंडे, दिनेश भगत, योगेश रत्नपारखे, अमोल ठाकूर, अजय कदम, गणेश मोहिते,दीपक वैद्य, किरण शिरसाठ, शुभम टेकाळे, अंकुश पाचफुले ,जफर खान ,उज्वलाताई फोपलीया, लक्ष्मण आप्पा अवघड, गोपी किशन गोगडे,निखिल पगारे ,किशोर पांगारकर, श्रीकांत पांगारकर ,संतोष जांगडे ,राजू माधववाले, रमेश टेकूर ,संताजी वाघमारे, विशाल बनकर, संजू गायकवाड, राम सत्कार, महेश दुसाने, प्रताप वर्मा ,काशिनाथ मगरे ,नरेश खुदभैय, लक्ष्मण लखन कणसे,मनोज लाखोले ,जगदीश रत्नपारखे, कांतराव रांजणकर, भोला कांबळे, फिटर खंदारे, संजय डुकरे, गणपत धोत्रे, सुशील भावसार ,सागर पाटील, कृष्णा मुळे, शिवसिंग तिलवारवाले, गोविंद सोनवणे ,शिवाजी लाड, भगवानराव अंभोरे ,सचिन देशमुख, बाळासाहेब जाधव राहुल गवारे, रवींद्र ढगे, ब्रह्मा वाघ ,सुधाकर वाडेकर, काशिनाथ जाधव, बंडू राजे ,आप्पा उगले ,आप्पासाहेब घोडके, कडूबा इंदलकर, दत्ता थेटे ,पांडुरंग डोंगरे, गणेश भुतेकर ,वैजनाथ कावळे, सोपान कावळे, विश्वजीत कापसे ,महादेव वाघ, संजय वाघ ,बाबासाहेब जराड ,भाऊसाहेब गोरे, बाबा गोरे ,भागवत भोरे ,जगन चौरे ,गोविंद चौरे , नारायण तात्या ढगे ,जनार्दनराव चौधरी ,बाबा मोरे ,बाळू देवडे, प्रभाकर सुळसुळे, अशोकराव डेंगळे, लक्ष्मण राठोड , गणेश राठोड, संजय राठोड ,रमेश जाधव,कमलाकर कळकुंबे, सुखदेव कळकुंबे ,गणेश गायकवाड ,बालाजी गायकवाड ,गजानन शेजुळ, नागेश डवले, निवरती साबळे, दत्तात्रय चव्हाण, विठ्ठल टेकाळे ,संभाजीराजे जाधव, ज्ञानेश्वर जाधव विठ्ठल जाधव ,रामचंद्र फुलझाडे,संदीप शिरसागर ,गणेश म्हस्के ,उद्धवराव भुतेकर, कृष्णा दादा डोंगरे ,तुकाराम लकडे, गणेश भुतेकर,देविदास सोमधाने ,परमेश्वर गंडाळ, ज्ञानेश्वर माऊली उबाळे, संदीप उबाळे,भरत उबाळे ,मोहन वाडेकर ,सुदर्शन देवडे ,राजू पवार, उदय तात्या तनपुरे ,लक्ष्मण उंबरे, संदीप काळे ,दत्ता काळे, राम काळे ,ज्ञानेश्वर काळे, तुकाराम खर्जुले, भागवत गिराम, शाळुराम गिराम ,संजय चव्हाण ,लक्ष्मण चव्हाण ,रामदास डुकरे,निरंजन चव्हाण,भागवत काळे ,गजानन काळे, रामकिसन कांयदे ,राम झारखंडे, धनंजय बावणे ,विश्वजीत कापसे ,भरत कापसे, यांच्यासह बुथ प्रमुख शिवदूत गटप्रमुख शिवसैनिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**वाजतगाजत प्रवेश**

विकास पुरुष अर्जुनराव खोतकर यांच्यावर विश्वास व्यक्त करीत विविध संघटनेचे,पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते वाजतगाजत शिवसेनेत प्रवेश करीत आहेत .देवमूर्ती, पवार तांडा ,प्रभाग क्रमांक तीन (मंठा चौफुली) ,या परिसरातील कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे कोणतीही अट न ठेवता संकटात साथ देणारा विकासपुरुष नेता म्हणून आम्ही प्रवेश करीत असल्याचे प्रवेश कार्यकर्त्यांनी सांगितले. यावेळी देवमूर्तीचे माजी उपसरपंच उत्तमराव कदम ,सुनील कदम ,विजय कदम, सोहेल शेख ,शेख मोशीन, पवार तांडा येथील अनिल पवार ज्ञानेश्वर आडे, विठ्ठल आडे, राजू पवार, परमेश्वर आडे, निलेश आडे, सतीश आ, संदीप पवार, बळीराम पवार, योगेश हाडे राजू पवार मच्छिंद्र आडे रमेश पवार गजानन पवार ज्ञानेश्वर पवार रामने शराडे प्रकाश आडे राम राठोड किशोर आडे भरत जाधव इत्यादी. मंठा चौफुली येथील बाळू बनसोडे नितीन खंदारे अजय काळे सौरभ थोरात गोपाल भुतेकर अजय डिखुळे गणेश काळे वैभव काळे गणेश लोखंडे शुभम कायदे सोनू गायकवाड वैभव सुरडकर शुभम साळवे संतोष पवार कृष्णा रोकडे आदींचा प्रवेश केलेल्या मध्ये समावेश आहे.

**मंगळवारी महारॅलीने भरणार उमेदवारी**

मंगळवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी महारॅली काढून महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव पंडितराव खोतकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे .मामा चौक येथून सिंधी बाजार- फुल बाजार सराफा रोड- कादराबाद -पाणी वेस्ट -मंमादेवी- गांधी चव्हाण- शनी मंदिर मार्गे भाग्यनगर येथे महारॅली चा समारोप सभेने होईल. या महा रॅलीस पदाधिकारी बूथ प्रमुख गट प्रमुख शिवदुत यांच्यासह कार्यकर्त्यांनी व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्यासह संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,महिला जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे ,शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, यांनी केले.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने बैठकीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** रिपबिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांचे निवासस्थान, डबल जिन, गांधी चमन येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आलं आहे. जाहिर झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने महत्वाच्या विषयावर चर्च करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

रिपबिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची भाजप सोबत युती आहे. परंतु, भाजपने विधानसभा निवडक २०२४ मध्ये रिपाईला एकही मतदारसंघ सोडलेला नाही. रिपाईच्या कार्यकर्त्यांना राज्यामध्ये निवडणूकीच्या कोणत्याही प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेतले जात नाही.

जालना जिल्ह्यात ५ विधानसभा मतदारसंघ आहेत. या सर्व मतदार संघात रिपाईची मोठी ताकद आहे. त्यामुळे या निवडणूकीत कुणाला मदत करायची या विषयावर चर्चा करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी राज्य संघटक, सचिव ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, महिला आघाडी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष गणेशराव रत्नपारखे, सुधाकर रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, ॲड. सिध्दार्थ चव्हाण, विजू खरात, अनिल खिल्लारे, मधूकर बोबडे, मुकुंइ पाईकराव, राहुल आदमाने यांनी केलं आहे.

झाडे लावा
झाडे जगवा




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.